शिक्षणाधिकारी,

माध्यमिक शिक्षण विभाग,

जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे कार्यालय,

रत्नागिरी ४१५ ६१२

दुरध्वनी क्र. ०२३५२ २२२४२५

E mail ID : eoratnagiri.sec@mahedu.gov.in, eosecratnagiri@gmail.com

जा.क्र.रजिप/शि.माध्य/माध्य-८/शिष्य/ ३५६ / २०१५ दिनांक : १७/०६/२०१६

दरपत्रके मागविणेबाबत

विषय: कोल्हापूर बालभारती विभाग ते रत्नागिरी मुख्यालय (शिक्षण विभाग माध्यमिक, जि.प. रत्नागिरी) तेथून जिल्हयातील सर्व पंचायत समिती कार्यालय व तेथून शाळास्तरापर्यंत पूस्तके वाहतूक करणेकरीता ट्रक, टेंपो वाहने प्रासंगिक तत्त्वावर भाडयाने पुरविणे करिता दरपत्रके मागविणेबाबत सन २०१६-१७.

माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी हे कार्यालय सन २०१६-१७ साठी उपरोक्त निर्देशित कामाकाकरीता ट्रक, टेंपो वाहने प्रासंगिक तत्त्वावर भाडयाने पुरविणे व हमाली (पूस्तके वजन अंदाजे ५ते ६ टन) या कामाकरीता अंदाजित दरपत्रके सक्षम ठेकेदारांकडून अटी व शर्तींना अधीन राहून सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

प्राप्त दरपत्रके दि.२४/०६/२०१६ पर्यंत सायंकाळी ५.००वा या कार्यालयात उघडण्यात येतील. प्राप्त दरपत्रकांपैकी दरपत्रक मंजूर करण्याचे अधिकार खालील सही करणार यांना राखून ठेवण्यात आले आहेत.

निविदा अटी व शर्ती

१) परिपूर्ण भरलेली दरपत्रके दि. २४/०६/२०१६ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत समक्ष या कार्यालयात सादर कराव्यात. पोस्टाने अथवा कुरिअरने किंवा अन्य मार्गाने आलेली दरपत्रके स्विकारली/ग्राहय धरली जाणार नाहीत.

२) कोल्हापूर ते रत्नागिरी व रत्नागिरी ते सर्व तालुके(९ तालुके) कार्यालये व तेथून शाळास्तरापर्यंत वाहतूक व हमाली खर्च ठेकेदारांनी करावयाचा आहे. त्यानुसारच दरपत्रके सादर करावीत.

३) सदर दरपत्रके दि. २४/०६/ २०१६ रोजी सायंकाळी ०५.०० वा. उघडण्यात येईल.

४) दरपत्रकातील मान्य दर प्रथम आदेश दिल्यापासून नियोजित काम संपेपर्यंत राहील.

५) ट्रक, टेंपो मोठया आकाराने व बंदिस्त अशा प्रकारचे असावेत.

६) वाहने पॅसेंजर कम गुडस(बंदिस्त) व व्यवस्थित चांगल्या स्थितीत असावीत.

७) परवानाधारक व अनुभवी वाहन चालक असावा.

८) कार्यालय मागणी करेल त्यावेळी गाडया त्वरीत उपलब्ध करुन दिल्या पाहीजेत.

९) कार्यालयीन मालाचे वाहतूकीमध्ये नुकसान झाल्यास भरपाई द्यावी लागेल.

१०) प्रवासामध्ये वाहन नादुरुस्त झाल्यास तातडीने पर्यायी व्यवस्था करणेची जबाबदारी ठेकेदारांवर राहील.

११) वरीष्ठ कार्यालयाकडून सदर कामाची रक्कम प्राप्त झाल्यानंतरच देयक आदा करणेत येईल.

१२) कार्यालयास समाधानकारक सेवा आवश्यकतेनुसार व तातडीने देणे बंधनकारक राहील. आपले काम समाधानकारक आढळले नाही तर आपणाला देण्यात आलेले काम कोणत्याही क्षणी काढून घेण्याचा अधिकार शिक्षणाधिकारी कार्यालयास राहील.

१३) या कार्यालयाची सर्व महत्त्वाची, तातडीची कामे विचारात घेता आपण तातडीने व समाधानकारक सेवा देणे आवश्यक/बंधनकारक राहील.

१४) कोणतेही दरपत्रके पूर्णत: अगर अंशत: स्विकारणे/ नाकारणे याबाबतचा अंतिम अधिकार या कार्यालयाकडे राखून ठेवण्यात आला आहे.

१५) अटी असलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

१६) कोणतेही कारण न देता कमी रकमेचे अथवा जादा रकमेचे दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे हे अधिकार या कार्यालयाकडे राहतील.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, रत्नागिरी

प्रत : नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी